इ० प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर — **P.S.(ठाणे):** शहर चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0163 — **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/05/2023 00:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार — **Date From (दिनांक पासून):** 22/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2023
**Time From (वेळेपासून):** 17:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/05/2023 — **Time (वेळ):** 00:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/05/2023 00:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी — **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भडकल गेट जवळील, , पोप्युलर कारबाजार,दुकानाजवळ,रोडवर औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

N.C.R.B
I.I.F.-I (एकीकृत ...

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सौ. गुरमीत कौर अमरजीत सिंग टक्कर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आनंदनगर प्लट नं2 व 3 ,पडेगांव,औरंगाबाद,मोनं 7666400550,शहर चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आनंदनगर प्लट नं2 व 3 ,पडेगांव,औरंगाबाद,मोनं 7666400550,शहर चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद मोतीराम पंडीत | | | 1. रचना सहायक, विशेष भुसंपादन ,अधिकारी, विशेष घटक, अधिकारी, विशेष घटक,शहर चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि.22/05/2023

मी सौ. गुरमीत कौर अमरजीत सिंग टक्कर, वय 48 वर्ष, व्यवसाय- गृहिणी, रा.आनंदनगर प्लॉट नं.2 व 3 पडेगांव, औरंगाबाद मो.नं. 7666400550.

मी वरील प्रमाणे असुन, मी दिनांक 19/05/2023 रोजी समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो, ऑफीस औरंगाबाद येथे माझे पती अमरजीत सिंग यांचेसह समक्ष हजर येऊन तक्रार दिली होती की, माझे वडील कै. अबचल नगर सिंग बिंद्रा यांचे नावे पीआर कार्ड नं.18400 व 18401 हॉटेल ग्रेट पंजाब समोर, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद रोडटच 15 दुकानाचे गाळे सन- 2008 पर्यंत अस्तीत्वात होते. ते गाळे महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयाच्या अतिक्रमण विभागाने आम्हाला कोणतीही पुर्व सुचना (नोटीस) न देता पाडले होते. त्यावेळी माझे वडील अबचल नगर सिंग बिंद्रा यांनी याबाबत उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे महानगरपालिका अतिक्रमण विभाग यांच्या या कारवाई विरोधात रिट पिटीशन क्र.5577/ 2008 प्रमाणे रिट दाखल केली होती. त्यानंतर माझे वडील सन-2021 मध्ये मयत झाल्याने मी त्यांची मुख्य वारस मुलगी म्हणुन मी व माझ्या भावाने पुढे सदर रिटपीटीशन मध्ये वारसदार म्हणुन प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. त्या रिटवर सुमारे 2008 ते 1 जानेवारी 2023 रोजी पावेतो न्यायालयीन सुनावणी झालेली आहे व दिनांक 01/01/2023 रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी आमच्या बाजुने निकाल देवुन महानगरपालिका, औरंगाबाद यांना आमच्या अतिक्रमणामध्ये पाडलेल्या मालमत्तेवर 40 मिटर रस्ता बनवल्याच्या मोबदल्यात जमीनीच्या व्हॅल्युएशन करुन योग्य ती रक्कम मोबदला स्वरुपात चार महिण्याचे आत आम्हाला दयावी असे आदेश मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी महानगरपालिका, औरंगाबाद यांना दिलेले आहेत.

सदरचे आदेश महानगरपालिका, औरंगाबाद अतिक्रमण कार्यालयास प्राप्त होवुन सुमारे चार महिने होत आलेले आहेत. परंतु अदयाप पर्यंत आमच्या मालमत्तेचे कोणतेही मुल्यांकन करुन आमच्या मालत्तेच्या मोबदला स्वरुपात रक्कम दिलेली नाही. त्यामुळे मी माझे पती असे दोघे मिळुन महानगरपालिका अतिक्रमण विभाग व नगर रचना विभाग येथे दिनांक 17/05/2023 रोजी जावुन प्रत्यक्ष चौकशी केली असता आमच्या प्रकरणाची फाईल विशेष भुसंपादन अधिकारी, (महानगरपालिका, औरंगाबाद) येथील विश्वनाथ दहे साहेब यांच्याकडे असल्या बाबत समजले. त्यामुळे आम्ही दहे साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेतली त्यावेळी दहे साहेबांनी मला आमच्या फाईल बाबत त्यांचे स्विय सहायक, विनोद पंडित यांची भेट घेण्यास सांगीतले व आमची फाईल पुढील कारवाईसाठी उप-संचालक, नगररचना विभाग यांच्याकडे पाठविली आहे असे देखील सांगीतले. त्याप्रमाणे मी व माझे पती श्री, अमरजीत सिंग यांनी विश्वनाथ दहे साहेब यांनी सांगीतल्याप्रमाणे त्यांचे स्विय सहायक विनोद पंडित साहेब यांची समक्ष भेट घेतली असता विनोद पंडित हे आम्हाला म्हणाले की, तुमच्या प्रकरणाची फाईल आमच्याकडे आलेली आहे. तुम्हाला अंदाजे 1 कोटी 50 लाख रुपये पर्यंत मोबदला स्वरुपात औरंगाबाद महानगरपालिके कडुन मिळणार आहेत. परंतु तुम्ही आता पर्यंत आम्हाला भेटायला आले नाही. त्यामुळे आम्ही आजुन पुढील कारवाई केलेली नाही. तुम्हाला या प्रकरणात मोबदला आणखी वाढवुन दयायचा किंवा कमी करायचा हे माझ्या हातात आहे. परंतू तुम्ही आजुनपर्यंत आमची कोणतीही सेवा केलेली नाही. त्यामुळे प्रकरण थोडे थांबवलेले आहे. तरी तुम्ही आता इथुन जा मी तुमच्याशी संपर्क साधतो आणि तुमच्या प्रकरणात सध्या मोबदला म्हणुन पहिला टप्पा 56,42,592/- रुपये देण्याचे दिनांक 24/04/2023 रोजी नगररचना विभागास आम्ही कळविलेले आहे. उर्वरीत मोबदला रक्कमेचे टप्पे ठरविण्यासाठी तुम्ही मला 2,00,000 /- (दोन लाख) रुपये दयावे लागतील. तेव्हा मी तुमच्या मोबदल्याची रक्कम वाढवुन तुम्हाला लवकरात लवकर या प्रकरणातील मोबदला रक्कम मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करेन आणि जर तुम्ही मला रुपये 2 लाख दिले नाहीत, तर तुमची मोबदला रक्कम कमी करुन ती तुम्हाला लवकर मिळवुन देणार नाही. कारण हे सगळे माझ्या हातात आहे. असे सांगुन मला पैशाची मागणी केलेली आहे. अशी तक्रार दोन पंचासमक्ष दिलेली आहे. माझ्या महानगरपालिकेतील

वरील कामासाठी दि.20/05/2023 रोजी भेटणार असल्याचे स्वत: विनोद पंडित यांनी माझ्याशी संपर्क ... कळविल्याने पुढील कारवाई दिनांक 20/05/2023 रोजी करावी अशी विनंती केली.
त्यानंतर दिनांक 20/05/2023 रोजी विनोद पंडित यांना मी फोनवर संपर्क करुन भेटण्याचे विचारले असता ... टिव्ही सेंटर येथील विवेकानंद गार्डन सामोर बोलावल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी निघालो त्यावेळी माझ्याकडे ... रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी, माझे पती अमरजीत सिंग टक्कर, व पंच क्र.1 डॉ. सुलतान असे टि.व्ही सेंटर येथील विवेकानंद गार्डन सामोर गेलो. त्या ठिकाणी विनोद पंडित यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना माझ्या कामाविषयी बोलले. त्यावेळी विनोद पंडित यांनी सगळी प्रोसेस केली मी, आमच्याकडं अथॉरेटी है, कम से कम और ज्यादा से ज्यादा के बिच मे देने की, हम कम से कम भि दे सकते, बिच मे भी दे सकते है, पर मै पुरा कोशीश करुंगा ज्यादा से ज्यादा पैसे देणे की, वो आपको भि खुला दिखाउंगा , झुट नही बोलुंगा त्यावेळी मी त्यांना उसका है की आप जो भी है , क्लिअर क्लिअर करले असे म्हणाले त्यावर पंडित हे म्हणाले की, क्लीअर ही बताता मै आपको त्यावेळी मी बोलले की, हां बोल दो ना फिर अभी तेव्हा पंडित हे अकडा ना, अकडा आपको फोन पे बोलुंगा असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना किलेर करुन घ्या असे बोलले त्यावेळी पंडित यांनी पंचासमक्ष मला व माझे पती यांना उजव्या हाताचे दोन बोट दाखवुन दोन असा इशारा केला तेव्हा मी बोलले की, कितने दो, दोन क्या ? असे म्हणाल्यावर विनोद पंडित हे एल...असे म्हणाले तेव्हा मी पंडित यांना दो एल, दो लाख असे विचारले असता माझे पती त्यांना म्हणाले की, ज्यादा नही हो रे.. तेंव्हा त्यांनी अभि नई, अभि नई, जब होंगा तब करो, मै आपको फोर्स नही करता असे म्हणाले. त्यावेळी मी पंडित यांना ठिक है, अभी अडव्हॉन्स कुच्छ देना है असे विचारले असता पंडित हे देना है तो दिजीये, नही तो...असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना मला नांदेडला जायचे आहे असे बोलले त्यावेळी त्यांनी करो, आप के हिसाब से करो मै, कुछ नही बोलता असे बोलले.त्यावेळी मी विनोद पंडित यांना दो आपके ही है ना, दो लाख आपके ही है दो है ना असे विचारले त्यावेळी त्यांनी ठिक है असे बोलले.
त्यानंतर दिनांक 21/05/2023 रोजी सकाळी विनोद पंडित यांचा मला फोन आला. मी तेंव्हा तो उचलला नाही. व तात्काळ ऍन्टी करप्शन ऑफीसला गेले. त्यावेळी क्षीरसागर साहेबांनी दोन्ही पंचांना बोलावुन पोलीस अंमलदार चव्हाण यांचे मार्फतीने व्हाईस रेकॉर्डर चालु करुन ठेवला. त्यानंतर लगेच मला 11.29 वा. विनोद पंडित यांचा फोन आला तो उचलून (रिसीव्ह करुन) मी विनोद पंडित यांचेशी फोनवरुन बोलले त्यावेळी पंडित यांनी मला "फायु झीरो फायु झीरो" असे म्हणाले तेंव्हा मी बोलले की, "फायु झीरो बोले तो पचास" त्यावेळी पंडित याने "चलता है चलता है मे आपको दो मिनीट मे बात करता हु" असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर माझा मोबाईल क्रं. 7666400550 वर विनोद पंडित यांनी त्यांचे मो क्रं. 9423028873 या क्रमांकावरुन 11.34 वाजता वॉट्सअप कॉल केला व वहीना मै बोला उतने असे म्हणुन पुन्हा "फायु झीरो, फायु झीरो, फायु झीरो" असे तीन वेळा बोलले त्यावेळी मी त्यांना "फायु झीरो का मतलब पचास हजार ना असे बोलले त्यावेळी विनोद पंडित यांनी "हां" असे बोलले. विनोद पंडित यांनी ऍडव्हान्स म्हणुन 50 हजार रुपये दिनांक 22/05/2023 रोजी सायंकाळी देण्याचे सांगितले होते.
त्याप्रमाणे आज दिनांक 22/05/2022 रोजी सायंकाळी 04.10 वाजता विनोद पंडित यांनी माझ्या फोनवर व्हॉटसअप कॉल करुन सव्वा पाच वाजता भडकल गेटजवळ येण्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी क्षीरसागर साहेबांना कळविले त्याप्रमाणे क्षीरसागर साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक असे भडकल गेटजवळील सुरक्षित जागी हजर आले त्या ठिकाणी मी माझे पती व माझा मुलगा असे माझ्याकडील चारचाकी खाजगी वाहनाने तयार होतो. त्याठिकाणी दोन्ही पंच, व मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिल्या त्यानंतर विनोद पंडित यांना देण्यासाठी 500/- रु.दराच्या 100 नोटा मी क्षीरसागर साहेबांकडे पंचासमक्ष हजर केल्या त्या नोटांचे नंबर लिहुन घेऊन त्या नोटांना ऍन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्याकडील छोट्याशा पर्समध्ये ठेवण्यात आल्या व माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र.1 डॉ.सुलतान यांना माझा नातेवाईक म्हणुन सोबत दिले व सोबत माझे पती व मुलगा अशांना भडकल गेटजवळ पाठविण्यात आले. तसेच क्षीरसागर साहेब व त्यांची टीम, पंच हे ही आमच्या पाठोपाठ भडकल गेटजवळ आजुबाजूला येऊन थांबले.
भडकल गेटजवळ आम्ही थोडा वेळ थांबलो असताना विनोद पंडित यांचा व्हॉटसअप कॉल आला व त्यांनी कोठे आहात याबाबत विचारणा केली असता त्यांना भडकल गेटजवळ उदय झेरॉक्सकडे जाणाऱ्या रोडवर थांबलो असल्याचे सांगितले. त्यानंतरही दोन वेळा व्हॉटसअप कॉल करुन आम्ही थांबलेले ठिकाणाची विचारणा करुन विनोद पंडित हे आमचे जवळ आले. त्यावेळी त्यांनी गाडी कोण चलाता असे म्हणुन पंच क्र.1 यांचे विषयी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना माझा भाचा असुन दिल्ली वरुन आला असुन रात्री होता त्या दिवशी असे सांगितले. त्यानंतर विनोद पंडित यांनी मला बोलले की, आपको देड से ज्यादा करने का है तो मुझसे बोलो असे म्हणुन माझ्या वरील कामाला टाईम है उसको पैसे मिलेगा क्योंकी पैसा तो मिलेगा..पर होनेवाला हमारे ऑफीस से ही है..देड से ज्यादा मिलेगा

असे म्हणुन मेरे तरफ तुमने काम छोडा है क्या नही..काम का मेरे तरफ छोडा है..अब टेन्शन नको लेऊ जब तक निवाडा नही होता तब तक कुछ नही बोलेंगे.. पचास के आगे ज्यादा करते तो देखते बाद में उसका कुछ नही बोलता छोडो..असे बोलुन माझ्या परिवाराची विचारपुस करुन एक पचास एक अठयाशी तक जाता मेरे हात मे है वो असे म्हणुन माझ्याकडुन 50,000/- रुपयांची मागणी केली त्यानंतर मी माझ्या पर्स मधील ॲन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या 500/- रुपये दराच्या 100 नोटांचे बंडल रबर लावलेले (नोटांचा जुडगा) काढुन विनोद पंडित यांचे समोर धरले असता त्यांनी त्यांच्या बॅग मध्ये ठेवण्याचे सांगत असताना मी त्यांना त्यांच्या हातात घेण्याचे विनंती केल्यावरुन त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने माझ्याकडील पैसे स्विकारुन त्यांच्या जवळील पाठीवरील काळया रंगाच्या बॅगच्या वरच्या बाजुचे पहिल्या कप्यात ते पैसे ठेवले. त्याचवेळी मी पुर्व नियोजीत ठरलेला लाच स्विकारल्याचा इशारा म्हणुन माझ्या डोळ्यावरील चष्मा माझ्या डाव्या हाताने डोळ्यावरुन काढुन माझ्या डाव्या हातात धरला. तेवढयात सापळा पथकातील अधिकारी,कर्मचारी यांनी तात्काळ पंच क्र.2 यांचेसह हजर येऊन विनोद पंडित यांना मी दिलेल्या पैशासह ताब्यात घेऊन, माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला.ती वेळ 17.45 वाजेची होती. तरी माझे वडीलांनी मा.उच्च न्यायालयात म.न.पा.औरंगाबाद यांचे विरुध्द दाखल केलेल्या रिट पिटीशनचा निकाल आमचे बाजुने लागुन आम्हास मोबदला म्हणुन नुकसान भरपाई देण्याचे आदेशाप्रमाणे महानगरपालिकेतील लवकरात लवकर कार्यवाही करुन जास्तीत जास्त मोबदला देण्यासाठी महानगरपालिका येथील विनोद मोतीराम पंडीत, रचना सहायक, विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी माझ्याकडे 2,00,000/- रुपयांची मागणी करुन ॲडव्हान्स म्हणुन 50,000/- रुपये आज दिनांक 22/05/2023 रोजी 17.45 वा.भडकल गेटजवळील पॉप्युलर कार बाझार दुकानाजवळ माझे पती व पंच क्र.1 डॉ. सुलतान यांचे समक्ष स्वत: स्विकारुन त्यांचेजवळील काळ्या रंगाचे पाठीवरील बॅगमध्ये स्वत: ठेवले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद असुन योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.

सदरची माझी फिर्याद दोन पंचासमक्ष मराठी भाषेत संगणकावर टंकलीखीत केलेली असुन ती मला वाचुन दाखवुन समजावुन सांगितली. बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DADARAO SAKHARAM SINGARE(I (Inspector)) / BOBN59639 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

गुरमीत कौर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DADARAO SAKHARA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN59639

डी.ओ.अधिकारी
पोलीस स्टेशन सिटी चौक
छत्रपती संभाजीनगर